दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य संपादक : सागरा राणा अंभोरे   संपादक : बंडूभाऊ इंगोले
RNI No - MHMUL/25/A0788

■ वाशीम ■ रविवार, ०१ फेब्रुवारी २०२६ ■ वर्ष : २ ■ अंक : २९५ ■ पाने : ४ ■ किंमत : ५ रूपये ■ Title code:- MAHMUL039353

# सुनेत्रा पवार महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री

महाराष्ट्र जीत

**मुंबई:** अजित पवार यांच्या निधनाने रिक्त झालेल्या उपमुख्यमंत्रिपदासाठी त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांचा शपथविधी शनिवारी लोकभवनवर साध्या पद्धतीने झाला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांना पद व गोपनीयतेची शपथ दिली. या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्रिमंडळातील प्रमुख मंत्री, राष्ट्रवादीचे (अजित पवार गट) नेते, मंत्री, आमदार, पदाधिकारी तसेच अजित पवार यांचे चिरंजीव जय पवार आणि कुटुंबातील इतर सदस्य उपस्थित होते.

मुख्य सचिव राजेश कुमार यांनी शपथविधी सोहळ्यासाठी राज्यपालांची परवानगी घेतली आणि त्यानंतर सुनेत्रा पवार यांचे नाव शपथ घेण्यासाठी नाव पुकारले. त्या व्यासपीठावर गेल्या. त्यांनी 'गांभीर्यपूर्वक' शपथ घेतली. यावेळी कोणीही टाळ्या वाजवल्या नाहीत. सुनेत्रा पवार शपथ घेण्यासाठी जाताना व शपथ घेतल्यानंतर राष्ट्रवादीच्या उपस्थित आमदारांनी 'अमर रहे अमर रहे अजित पवार अमर रहे', 'एकच वादा अजित दादा' अशा घोषणा दिल्या. यावेळी उपस्थित भावनिक झाले होते.

अजित पवार यांच्या अकाली निधनामुळे राष्ट्रवादीत आणि राज्याच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा स्थितीत सुनेत्रा पवार यांच्यासमोर पक्ष आणि प्रशासन दोन्ही आघाड्यांवर मोठे आव्हान उभे ठाकले आहे. पक्षावर नियंत्रण ठेवणे, निर्माण झालेल्या संकटातून पक्षाला बाहेर काढणे व संघटनात्मक स्थैर्य राखणे, ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्यावर आहे.

"अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेत 'शिव-शाहू-फुले-आंबेडकर' यांच्या विचारांवर निष्ठा ठेवून कर्तव्य भावनेने उपमुख्यमंत्री पदाची जबाबदारी स्वीकारताना मन अक्षरशः



भरून येत आहे", असे सुनेत्रा पवार म्हणाल्या.

उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यापूर्वी सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली. विधानभवनात अजित पवार ज्या दालनात बसायचे त्याच दालनातील हॉलमध्ये दुपारी दोन वाजता राष्ट्रवादीच्या आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीला पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्यासह पक्षाचे सर्व मंत्री आणि आमदार उपस्थित होते. ज्येष्ठ मंत्री छगन भुजबळ यांनी सुनेत्रा पवार यांच्या निवडीबाबतचे ठराव मांडले.

"महाराष्ट्राच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री म्हणून पदभार स्वीकारल्याबद्दल सुनेत्रा पवार यांना मी शुभेच्छा देतो. त्या महाराष्ट्रातील जनतेच्या कल्याणासाठी अथक प्रयत्न करतील आणि दिवंगत अजितदादा पवार यांचे 'व्हिजन' पूर्ण करतील, असा मला विश्वास आहे", असे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. तर, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "ज्या धिरोदात्तपणे सुनेत्रा वहिनींनी महाराष्ट्र हिताचा निर्णय घेतला तो कौतुकास्पद, धाडसी आणि त्यांची प्रतिबद्धता अधोरेखित करणारा आहे. महाराष्ट्रासाठी झोकून देऊन काम करणाऱ्या अजितदादांचा वारसा त्या समर्थपणे चालवतील असा मला विश्वास आहे."

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ ही खाती सोपविण्यात आली आहेत. अजित पवार यांच्याकडे असलेले वित्त खाते मात्र त्यांना मिळाले नाही. हे खाते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असून तेच आगामी अर्थसंकल्प सादर करतील. सुनेत्रा पवार यांच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी झालेल्या निवडीची माहिती देण्यासाठी आणि त्यांचा मंत्रिमंडळात समावेश करून शपथविधी सोहळ्याबाबत विनंती करण्यासाठी राष्ट्रवादीच्या नेत्यांनी 'वर्षा'वर जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, संजय बनसोडे आणि समीर भुजबळ उपस्थित होते. यानंतर मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना याबाबत अवगत केले आणि सायंकाळी पाच वाजता सुनेत्रा पवार यांचा शपथविधी सोहळा पार पडला.

**राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा नाही**

सुनेत्रा पवार इतक्यात राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देणार नाहीत. नियमातील तरतुदीनुसार त्या उपमुख्यमंत्री झाल्या असल्या तरी विधानसभेवर निवडून येईपर्यंत राज्यसभा सदस्य म्हणून काम पाहू शकतात. बारामती पोटनिवडणुकीतील विजयानंतर त्या राज्यसभा सदस्यत्वाचा राजीनामा देतील, अशी शक्यता आहे.

# देशिंग परिसरात तुतारीचा प्रचार सुरू.

## ग्रामस्थ व. महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

महाराष्ट्र जीत

**कवठेमहांकाळ:-** तालुक्यातील देशिंग पंचायत समिती व जिल्हा परिषद गट गणात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा प्रचाराचा शुभारंभ शनिवारी दिनांक ३१ जानेवारी रोजी देशिंग येथील हनुमान मंदिरात श्रीफळ वाढवून करण्यात आला.यावेळी उमेदवारांना मतदारांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळताना दिसला. गावोगावी,वाड्या वस्त्यांवर उमेदवारांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात येत आहे. देशिंग जिल्हा परिषद गटाचे अधिकृत उमेदवार रागिणीताई मनोहर पाटील आणि पंचायत समिती गणाचे अधिकृत उमेदवार संजना बाबासो जगताप यांच्या प्रचारादरम्यान स्थानिक पातळीवरील पाणीपुरवठा,रस्ते,शेतीसाठी आवश्यक वीज,युवकांचे रोजगार,महिलांच्या समस्या



तसेच ग्रामविकासाशी संबंधित विविध प्रश्नावर मतदारांशी थेट संवाद साधण्यात आला.आमदार रोहित पाटील यांच्या नेतृत्वाखाली विकासाचा मांडलेला आराखडा व लोकाभिमुख भूमिका मतदारांना भावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रचार शुभारंभ प्रसंगी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे पदाधिकारी,आजी माजी लोकप्रतिनिधी,गावपातळीवरील कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या प्रचार शुभारंभ प्रसंगी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाच्या वातावरणासोबत संघटनात्मक ताकद दिसून आली.एकूणच देशिंग जिल्हा परिषद गट व गणात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचार शुभारंभ पाहता,पक्षाच्या पारड्यात अनुकूल वातावरण निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# काँग्रेसची सत्ता आणणे हीच बापूंना खरी श्रद्धांजली; सांगली काँग्रेस भवनात पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न

महाराष्ट्र जीत

**सांगली -** महात्मा गांधी (बापू) यांच्या पुणयतिथी निमित्त सकाळी 10/15 वाजता स्टेशन चौक येथे महात्मा गांधी पुतळयास मा राजेशजी (दादा) नाईक व मौलाली वटंमोरे यांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन केले या वेळी उपस्थित अजितराव ढोले, सचिन चव्हाण, अमित पारेकर, पैगंबर शेख, अरूण पळसुले, अजृन सुतार, होते

व तसेच काँग्रेस भवन सांगली येथे शहर जिल्हाध्यक्ष राजेशजी नाईक व सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष अजितराव ढोले यांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या प्रतीमेस पुष्पहार घालून अभिवादन केले या वेळी उपस्थित मौलाली वटंमोरे, जिल्हा सचिवसचिन चव्हाण, विश्वास यादव, प्रमोद इनामदार, अरुण पळसुले अर्जून सुतार, शैलेंद्र पिराळे,






राजेंद्र कांबळे, नामदेव पठाडे, सुनिल भिसे विठ्ठलराव काळे जन्नत नायवकडी, शमशाद नायवकडी, प्रतिक्षा काळे, राहुल शिंदे, मिना शिंदे, कांचन खंदारे, इनामदार चाचा, दीपक ताटे शिवाजी माळी गणेश वाघमारे इत्यादि मान्यवर उपस्थित, होते

यावेळी मनोगत व्यक्त करताना राजेश जी नाईक म्हणाले महात्मा गांधी यांनीअहिंसा च्या मार्गाने आयुष्य भर जगले व बलाढ्य इग्रंज सरकारला सळो कि करून सोडले व देशाला स्वातंत्र्य मिळवुन दिले आज परत जगाला शांतीपूर्ण जगने साठी अहिंसा मार्गाने जन आंदोलन उभारून परत काँग्रेसचे सत्ता आणने हिच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल

यावेळी प्रदेश संघटक पैगंबर शेख जिल्हा समन्वयक अमित पारेकर सेवा दलाचे जिल्हाध्यक्षअजित ढोले यांनीही आपले मनोगत व्यक्त केली






# रायगड मध्ये ४१ दृष्टिहीनांना घडले सृष्टीचे दर्शन

## जिल्ह्यात १४७ जणांचे मरणोत्तर नेत्रदान

महाराष्ट्र जीत

**अलिबाग :-** 'संपलो जरी मी, तरी कुणाच्या नजरेत अजून जगतो मी'' ही उदात्त मानवी भावना प्रत्यक्षात आणण्याचा एकमेव शाश्वत मार्ग म्हणजे मरणोत्तर नेत्रदान! मरणानंतरही दुसऱ्यासाठी जगण्याची ही आस रायगड जिल्ह्यातील नागरिक मरणोत्तर नेत्रदानातून पूर्ण करीत आहेत. अशा नेत्रदात्यांमुळे १ एप्रिल २०२१ ते ३१ डिसेंबर २०२५ या पावणेपाच वर्षात ४१ दृष्टिहीनांना सृष्टीचे नितांतसुंदर दर्शन घडले. माणसाच्या मृत्यूनंतर त्याचे नेत्र काही तास जिवंत असतात. मृत्यूनंतर काही तासांत काढलेल्या नेत्रांचा अंधत्व आलेल्यांना फायदा होऊ शकतो. हे जग पुन्हा पाहता येऊ शकते. नेत्ररोपण यशस्वी झालेल्या व्यक्तीला ६० टक्के दिसू शकते. नेत्रदानासाठी मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या शरीरातून सहा तासांच्या आत डोळ्यातील नेत्रपटल काढून घेणे आवश्यक असते. या डोळ्यांचे दोन ते तीन दिवसांमध्ये रोपण होणेही आवश्यक असते. नेत्ररोपणामध्ये बुबुळाच्या पाठीमागे असलेल्या 'कॉनिर्या' या भागाचे रोपण केले जाते. रायगड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये नेत्रदानाबद्दल चांगली जनजागृती होत आहे. वर्षाला सुमारे ३०० नागरिक मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प करीत आहेत. त्यामुळे अशा नेत्रदानाचे प्रमाणही वाढले आहे. १ एप्रिल २०२१ ते डिसेंबर २०२५ या पावणेपाच वर्षात जिल्ह्यात १४७ जणांचे मरणोत्तर नेत्रदान झाले. यामधून ४१ अंधांवर बुबुळ रोपण शस्त्रक्रिया करून नवी दृष्टी देण्यात आली. तर उर्वरित जणांचे नेत्रपटल संशोधनासाठी पाठविण्यात आले आहेत.





नेत्रदान

| वर्ष | जिल्हा रुग्णालय | शंकरा | लक्ष्मी | एकूण | सर्जरी | रिसर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ एप्रिल २१ ते ३१ मार्च 22 | ०० | ० | ३४ | ३४ | ०६ | १४ |
| १ एप्रिल २२ ते ३१ मार्च 2३ | ३६ | ० | ४८ | ८४ | १३ | २७ |
| १ एप्रिल २३ ते ३१ मार्च 2४ | 22 | ०४ | ४० | ६६ | १३ | ३३ |
| १ एप्रिल 2४ ते ३१ मार्च 2५ | 24 | ०६ | ४२ | ७२ | ०४ | २९ |
| १ एप्रिल २५ ते ३१ डीसे 2५ | ०६ | ०६ | २६ | ३८ | ०५ | १३ |

असे झाले नेत्रदान

1 एप्रिल २१ ते ३१ डिसेंबर २५ या कालावधीत रायगड जिल्ह्यात १४७ जननी मरणोत्तर नेत्रदान केले. (२९४ नेत्र बुबुलांचे संकलन

जिल्हा रुग्णालयात ८८ नेत्र बुबुळे संकलन (४४ जणांचे नेत्रदान )

शंकर आय बँक १६ नेत्र बुबुळे संकलन (०८ नेत्रदान )

लक्ष्मी आय बँक १९० नेत्र बुबुळे संकलन (८० जणांचे नेत्रदान )

शस्त्रक्रिया ४१

संशोधन ११६

इतर संस्थेत पाठवलेले नेत्र बुबुळ ०६

## संपादकीय

### सुकलेला रुपया आणि वाढते वजन

जग झपाट्याने आत्मकेंद्रित होत असताना आपण त्याच वाटेवर का चालतो आहोत, हा मूलभूत प्रश्न टाळत यंदाचा आर्थिक पाहणी अहवाल मांडण्यात आला आहे. या अहवालात सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर आधी जाहीर करण्यात आलेल्या अंदाजापेक्षा कमी राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. वास्तवाचे हे चित्र सरकारला मान्य करावे लागले, एवढेच नव्हे तर काही अप्रिय सत्येही या अहवालातून समोर आली आहेत.

केंद्रीय अर्थसंकल्प दरवर्षी फेब्रुवारीच्या पहिल्या दिवशी सादर करण्याची प्रथा सरकारने स्वतः ठरवली आहे. यंदा १ फेब्रुवारी रविवार असतानाही हा नियम पाळण्यात येणार असून त्यामुळे त्या दिवशी भांडवली बाजारही खुला राहणार आहे. परंपरेनुसार अर्थसंकल्पाच्या आदल्या दिवशी आर्थिक पाहणी अहवाल मांडला जातो. कारण अर्थसंकल्प भविष्यातील दिशा दाखवतो, तर आर्थिक पाहणी सरत्या वर्षाचा आरसा असतो. मात्र, यंदा हा संकेत पाळण्यात आलेला नाही. आर्थिक पाहणी अहवाल थेट २९ जानेवारीला सादर करण्यात आला.

हे का घडले, या प्रश्नामागे फार खोलात जाण्याचे आता कारण उरलेले नाही. त्यामुळे त्या चर्चेत न पडता अहवालातील आशयाकडे लक्ष देणे अधिक योग्य ठरेल. एकेकाळी अरविंद सुब्रमणियन यांनी आर्थिक पाहणी अहवालाला केवळ सरकारी कागदपत्र न राहता वाचनीय स्वरूप दिले. आकडेवारीचा कोरडेपणा टाळत त्यांनी त्याला कथनशैली दिली. त्यांच्या नंतर आलेले अनंत नागेस्वरन या परंपरेला फारसा धक्का देत नाहीत. शैलीत थोडी रुक्षता असली तरी त्यांचा अहवालही वाचकाला गुंतवून ठेवणारा आहे.

यंदाच्या आर्थिक पाहणी अहवालात जागतिक भवितव्याबाबत तीन शक्यता मांडण्यात आल्या आहेत. पहिल्या शक्यतेनुसार २०२६ मध्ये जग 'नियंत्रित गोंधळा'त जगेल. दुसऱ्या मते बहुकेंद्री जागतिक व्यवस्था विस्कळीत होईल, तर तिसऱ्या शक्यतेत जागतिक व्यवस्थेला एकामागोमाग एक धक्के बसत राहतील. पहिल्या दोन शक्यता घडण्याची शक्यता ४० ते ४५ टक्के असून तिसरीची शक्यता १० ते २० टक्के इतकी आहे. या तिन्ही चित्रांमधला समान धागा असा की भविष्यातील जग नियमबद्ध, स्थिर आणि ठरावीक दिशेने जाणारे राहणार नाही. विस्कळीतपणा हा नवा स्थायीभाव असेल आणि त्यात अर्थव्यवस्था कशी सांभाळायची, याचा विचार अहवाल करतो.

या सगळ्यात बाजारातील अस्थिरता हा आणखी एक समान मुद्दा आहे. भांडवली बाजारात चढउतार वाढतील आणि परिस्थिती इतकी बिघडेल की सरकारला हस्तक्षेप करावा लागेल, असा इशारा अहवाल देतो. त्यामुळे गुंतवणूकदारांनी अतिआशावादी अपेक्षा ठेवू नयेत, असा अप्रत्यक्ष सल्लाही यातून मिळतो.

मात्र, या सगळ्याच्या मुळाशी जाण्याचे धाडस अहवाल दाखवत नाही. जग आत्मकेंद्रित होत असल्याने समस्या वाढत आहेत, असे तो म्हणतो; पण मग अशा वातावरणात आपणही तेच का करतो, हा प्रश्न टाळतो. अमेरिका, युरोप किंवा इतर देश 'आमचाच बाजार आमच्यासाठी' अशी भूमिका घेत असताना आपणही त्याच वाटेवर जाणे योग्य आहे का, हा मुद्दा दुर्लक्षित राहतो. एका बाजूला मुक्त व्यापार करारांची चर्चा, तर दुसरीकडे आयातीच्या भीतीने सीमा अधिक घट्ट करण्याची तयारी—या विसंगतीकडे अहवाल फारसा बोट दाखवत नाही. कारण वास्तव असे की जागतिक उत्पादनात भारताचा वाटा केवळ १.८ टक्के आहे, तर सेवा क्षेत्रातही तो सुमारे ४.२ टक्क्यांवरच आहे.

यातून निर्यातप्रधान अर्थनीतीची गरज ठळकपणे समोर येते. ज्यांच्या नावाने आपण अनेकदा टीका करतो, त्या अमेरिकेचा जागतिक व्यापारातील वाटा तब्बल २५ टक्के आहे. आपण कुठे उभे आहोत आणि इतर कुठे आहेत, याचे भान ठेवण्याची गरज हा अहवाल अप्रत्यक्षपणे अधोरेखित करतो. तरीही, एकूण सूर 'सगळे ठीक चालले आहे' असा ठेवण्याचा प्रयत्न दिसतो.

आर्थिक पाहणी अहवालानुसार यंदा सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढ ६.८ ते ७.२ टक्क्यांच्या दरम्यान राहील. हा अंदाज आधीच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने व्यक्त केला होता.

## माहिती विभागाचे छायाचित्रकार अनिल यमकर यांचा निवृत्ती निमित्त सत्कार



महाराष्ट्र जीत

कोल्हापूर :- माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे छायाचित्रकार अनिल मालोजी यमकर यांची 35 वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर एकतीस जानेवारीला निवृत्ती झाली.कोल्हापूर येथील माहिती विभागाच्या दोन्ही कार्यालयाच्या वतीने तसेच जिल्ह्यातील माध्यम क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

माहिती विभागातील छायाचित्रकार म्हणून गेली अनेक वर्ष ते कार्यरत होते. कोल्हापूर जिल्ह्यात आलेल्या महापुरापासून तर सर्व महत्त्वाच्या घटनाक्रमाचे शासकीय छायाचित्रकार म्हणून ते सक्रियपणे कार्यरत होते.अनेक दशकांचा कोल्हापूरचा इतिहास त्यांच्या नजरेतून कॅमेराबद्ध झाला आहे.

माहिती जनसंपर्क विभागाच्या विभागीय व जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित कार्यक्रमांमध्ये आज जिल्हाधिकारी श्री. अमोल येडगे,माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे निवृत्त उपसंचालक वसंत शिर्के,सध्याचे उपसंचालक प्रवीण टाके,विभागीय अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष समीर देशपांडे,जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ,सांगली जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बिडकर,यमकर यांच्या पत्नी सौ. अंकिता यमकर यांच्या उपस्थितीत एका शानदार कार्यक्रमात त्यांना सपत्नीक निरोप देण्यात आला.त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या कारकिर्दीवर बनवलेली चित्रफीत विशेष उल्लेखनीय ठरली.

या कार्यक्रमाला यमकर यांचे बालमित्र,आप्तेष्ट,कौटुंबिक सदस्य,तसेच माध्यम क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.यामध्ये प्रामुख्याने उपजिल्हाधिकारी संपत खिलारी, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष शितल धनवडे,शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी आलोक जत्राटकर,विभागीय अधिस्वीकृती समितीचे सदस्य प्रताप नाईक,महावितरणचे जनसंपर्क अधिकारी विश्वजीत भोसले,माहिती अधिकारी एकनाथ पोवार,सेवानिवृत्त जिल्हा माहिती अधिकारी मिलिंद बांदीवाडेकर,शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागाचे माजी विभाग प्रमुख रत्नाकर पंडित,निवृत्त माहिती अधिकारी सखाराम माने,दिलीप घाटगे यांच्यासह विविध वृत्तवाहिन्या,वृत्तपत्रांचे प्रतिनिधी तसेच छायाचित्रकार व कॅमेरामन उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी अनिल यमकर यांनी गेल्या 35 वर्षात माहिती विभागाच्यावतीने केलेल्या जनसंपर्काचे कौतुक केले.माहिती विभागाचे स्थानिक संपर्क अधिकारी म्हणून त्यांची विशेष ओळख होती. जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी त्यांच्या वक्तशीरपणाचे व सातत्याचे यावेळी कौतुक केले.तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या विविध विभागाच्या अधिकारी व प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींना यमकरांकडून मिळणाऱ्या प्रतिसादाचा उपसंचालक प्रवीण टाके यांनी विशेष उल्लेख केला.माजी उपसंचालक वसंत शिर्के यांनी त्यांच्या दांडग्या जनसंपर्काचे कौतुक केले.अन्य मान्यवरांनी देखील यमकर हे माहिती व जनसंपर्क विभागाचे स्थानिक ब्रँड अँबेसिडर झाले होते अशा शब्दात त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माहिती अधिकारी वृषाली पाटील यांनी केले तर आभार प्रदर्शन उपसंपादक रणजीत पवार यांनी केले.

## किनवट तालुक्यातील धावत्या रेल्वेतून पडून तरुणाचा मृत्यू

महाराष्ट्र जीत

**दक्षिण नांदेड:-** किनवट तालुक्यातील बोधडी रेल्वे स्थानकाजवळ धावत्या रेल्वे गाडीतून पडल्याने गंभीर जखमी झालेल्या ३३ वर्षीय तरुणाचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात शोककळा पसरली असून, ग्रामस्थ आणि नातेवाईकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.मृत तरुणाचे नाव मारोती रामा बोईनवाड (वय ३३, रहिवासी बोधडी) असे आहे. स्थानिक माहितीनुसार, ते धावत्या रेल्वे गाडीतून अपघाताने पडले होते. यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली. लगेचच त्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु वैद्यकीय उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.या अपघाताबाबत अधिक तपशील उपलब्ध नसले तरी, रेल्वे प्रवासादरम्यान असुरक्षितपणे प्रवास करणे किंवा इतर कारणांमुळे असे अपघात घडत असल्याचे दिसून येते. स्थानिक पोलिसांनी घटनेची नोंद घेऊन पुढील तपास सुरू केला आहे.परिसरातील नागरिकांनी या दुर्दैवी घटनेबद्दल खेद व्यक्त केला असून, कुटुंबीयांना आधार देण्याचे आवाहन केले आहे. रेल्वे प्रवाशांनी सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले आहे.




किनवट तालुक्यातील बोधडी येथील तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू

## वाळू च्या ट्रॅक्टर ने एकाला चिरडले , हस्तरा येथील घटना

महाराष्ट्र जीत

**तळणी :-** हस्तरा ता . हदगाव येथे वाळू च्या ट्रॅक्टर ने प्रातः विधी करीता गेलेल्या एका ला चिरडल्याची घटना ३० जानेवारी शुक्रवार रोजी सकाळी ४ ते ५ वाजेच्या दरम्यान घडल्याची घटना घडली आहे . हस्तरा येथील बाळू केरबा कांबळे ( वय ५५ ) हे नेहमी प्रमाणे सकाळी लवकर शौचास गेले असता वाळूने भरलेल्या ट्रॅक्टर ने चिरडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला आहे . घटना घडल्याने ट्रॅक्टर पसार झाले आहे . हस्तरा येथून कयाधू नदीतील वाळू उपसा रात्रीला बेसुमार होत आहे या कडे महसुल विभाग दुर्लक्ष करीत असल्याने विना परवाना वाळूचा बेसुमार उपसा होत आहे . कयाधू नदीतून वाळू घेऊन जातांना सकाळी - सकाळी धुक्के असल्यामुळे ट्रॅक्टर चालकाला समोरचे काही दिसले नसावे म्हणून अपघात घडल्याचे ग्रामस्थ चर्चा करीत आहेत . अपघात घडल्यावर ट्रॅक्टर रोडच्या खाली गेले होते . सदर ट्रॅक्टर चालकाने रस्त्यात पडलेला बाळू चा मृत्यू देह रस्त्याच्या बाजूला टाकून ट्रॅक्टर सह पलायन केले . हि घटना गावालगत घडली परंतू सकाळी ४ ते ५ वाजेच्या दरम्यान घडल्याने गावातील नागरीक घटना स्थळा कडे कोणी फिरकले नसल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत . मृत्यू देह शेवविच्छेना करीता हदगाव च्य ग्रामीण उप जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आला असून मृतकाचे दोन्ही मुले कामा निमीत्त पुणे येथे असल्याने ते आल्यावर गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु होईल असे पोलीस कर्मचारी भारत गायकवाड यांनी सांगितले .

## मेरा युवा भारत केंद्राच्या वतीने सुभाषचंद्र बोस जयंती व पराक्रम दिन उत्साहात साजरा.

### नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ केकतउमरा व बाकलीवाल विद्यालय एन.सी.सी. विद्यार्थ्यांचा सहभाग

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत केंद्र, वाशिम यांच्या वतीने 23 जानेवारी, थोर स्वातंत्र्यसैनिक नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीनिमित्त पराक्रम दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम पोलीस मुख्यालय, वाशिम येथील कवायत मैदानावर आयोजित करण्यात आला होता.कार्यक्रमास बाकलीवाल विद्यालयाचे एन.सी.सी. अधिकारी अमोल काळे, पी.एम.सी. केंद्रीय जवाहर नवोदय विद्यालयाचे एन.सी.सी. अधिकारी श्री. देशमुख, नेहरू युवा मंडळ अध्यक्ष तथा मा. राष्ट्रीय युवा कोर श्री. प्रदीप पट्टेबहादूर, नगर परिषद महात्मा गांधी विद्यालयाचे एन.सी.सी. अधिकारी पठाण आदी मान्यवर प्रमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.याप्रसंगी एन.सी.सी. अधिकारी अमोल काळे यांनी मनोगतात सांगितले की, "नेताजी सुभाषचंद्र बोस हे शिस्त, देशप्रेम आणि त्यागाचे मूर्तिमंत उदाहरण होते. युवकांनी त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन राष्ट्रसेवेसाठी सदैव सज्ज राहिले पाहिजे. पराक्रम दिन हा केवळ स्मरणाचा नाही तर कृतीचा दिवस आहे."

यावेळी सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रदीप पट्टेबहादूर यांनी केले. कार्यक्रमाला बाकलीवाल विद्यालय, पीएमसी केंद्रीय नवोदय विद्यालय, नगर परिषद महात्मा गांधी विद्यालय येथील एन.सी.सी. विद्यार्थी-विद्यार्थिनी, राजा प्रसेनजित अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था, केकतउमरा येथील प्रतिनिधी तसेच स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातून युवकांमध्ये देशभक्ती, शिस्त व नेतृत्वगुण वृद्धिंगत करण्याचा संदेश देण्यात आला.

सदर कार्यक्रम हा मेरा युवा भारत केंद्र वाशिम जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर,कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. यावेळी स्वयंसेवक दत्ता मोहळे, अतिश टापरे, दत्ता काकडे, अतिश कांबळे, रा.सेयो. माय भारत स्वयंसेविका आकांक्षा गायकवाड, रोशनी चंद्रशेखर, निकिता पट्टेबहादूर, सुहानी पट्टेबहादूर यांचा सहभाग लाभला , उपस्थित सर्वांचे आभार नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ केकतउमरा व मेरा युवा भारत केंद्र वाशिम यांच्या वतीने मान्यता आले.

## मेरा युवा भारत केंद्राच्या वतीने राष्ट्र. महात्मा गांधी स्मृतिदिन व हुतात्मा दिनी अभिवादन.

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत मेरा युवा भारत केंद्र, वाशिम यांच्या वतीने 30 जानेवारी - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त हुतात्मा दिन अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन मागासवर्गीय मुलींच्या शासकीय वसतिगृह, सिव्हिल लाईन, वाशिम येथे करण्यात आले. कार्यक्रमास जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त युवा समाजसेवक श्री. प्रदीप पट्टेबहादूर व गृहपाल श्रीमती वर्षा लाकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यावेळी प्रदीप पट्टेबहादूर यांनी मनोगतात सांगितले की, "महात्मा गांधी यांचे सत्य, अहिंसा व सेवाभावाचे विचार आजच्या युवापिढीसाठी दिशादर्शक आहेत. हुतात्म्यांच्या बलिदानातूनच आपल्याला स्वातंत्र्य लाभले असून ते विचार आत्मसात करून समाजहितासाठी कार्य करणे हीच खरी आदरांजली आहे." या प्रसंगी श्रीमती वर्षा लाकडे यांनी विद्यार्थिनींना महात्मा गांधींच्या जीवनमूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले, तर एका विद्यार्थिनीने आपले मनोगत व्यक्त करत गांधीजींच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजसेवेत योगदान देण्याचा संकल्प व्यक्त केला.हा कार्यक्रम जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर व कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिता राजगुरू यांनी केले. उपस्थित सर्वांचे आभार विशाखा ताजने यांनी मानले. कार्यक्रमास मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह, राजा प्रसेनजित अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था व नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ, केकतउमरा यांचे सहकार्य लाभले.

## सर्वसामान्याचे प्रश्न सोडविण्यासाठी जि.प. निवडणूक रिंगणात : शशिकांत जमदाडे



महाराष्ट्र जीत

**तासगाव/ प्रतिनिधी :** मणेराजुरी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदासाठी निवडणूक प्रचारार्थ जिल्हा परिषदेचे उमेदवार यांनी मणेराजुरी येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. मणेराजुरी व पंचायत समिती गणातील कार्यकर्ते एकत्रितपणे बोलावून बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी माझी उमेदवारी ही सर्वसामान्य जनतेला न्याय देण्यासाठी व प्रश्न सोडविण्यासाठी असल्याचे मत जिल्हा परिषदेचे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार शशिकांत जमदाडे यांनी या बैठकीत व्यक्त केले.यावेळी सावर्डे गणातील नितीन पाटील यांनी घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून जिल्हा परिषद सदस्य व दोन्ही पंचायत समिती गणातील उमेदवार यांना निवडून द्यावे असे आवाहन केले.यावेळी माजी खासदार संजयकाका पाटील,माजी सरपंच सचिन जमदाडे,माजी सरपंच रावसाहेब पाटील,अरविंद शिंदे व जिल्हा परिषद गटातील प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी तासगाव अर्बन बँकेचे संचालक प्रदिप पवार यांनी यांनी सांगितले कोणत्याही अफवाला बळी न पडता सर्वांनी अजितदादा पवार यांच्या उमेदावारांना प्रचंड मतांनी निवडून द्यावे.स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना यावेळी सर्व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत श्रद्धांजली वाहण्यात आली.

## प्रतिभा धुमाळे जिल्ह्यातील उत्कृष्ट १३ मध्ये कवठेमंहाकाळ तालुक्यातील मोरगावच्या एकमेव तलाठीचा समावेश.

महाराष्ट्र जीत



कवठेमहांकाळ :- नुकताच देशा "दै वाळवा क्रांती" सत्ताक दिन मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात आला.या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्याकडून करण्यात आलेल्या मूल्यमापनानुसार जिल्ह्यातील ८९ तलाठीपैकी १३ उत्कृष्ट तलाठ्यांची नावे नुकतीच जाहीर करण्यात आली.या धयादीत कवठे महांकाळ तालुक्यातील एकमेव मोरगाव गावच्या प्रतिभा धुमाळे यांचा समावेश असल्याने त्यांचे तालुक्यातील सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. सांगली जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी गाव स्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देऊन त्यांना जास्तीत जास्त कार्यक्षमतेने काम करण्याचा उत्साह मिळावा या हेतूने संपूर्ण सांगली जिल्ह्यातून ८९ तलाठी निवडले होते.या निवडलेल्या तलाठ्यांनी अँग्री स्टॅक,लक्ष्मी मुक्ती,पोट खराब क्षेत्र लागवडी खाली आणणे,आयुष्मान भारत कार्ड काढून घेणे,अवयव दान करणेसाठी लोकांकडून नोंदणी करून घेणे या आणि इतर सरकारी योजना कार्यरत असलेल्या गावात राबवायच्या होत्या.तलाठ्यांच्या या कार्याचे प्राथमिक मूल्यमापन करून उत्कृष्ट १३ तलाठी घोषित करण्यात येणार होते. या योजनाच्या अनुषंगाने तालुक्यातील मोरगाव येथे कार्यरत असलेल्या तलाठी प्रतिभा धुमाळे यांनी पुढाकार घेऊन सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. देशिंग-मोरगाव गावचे लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांचे सहकार्य देखील प्रतिभा धुमाळे यांना लाभले.या सगळ्याचे फलित म्हणजेच जिल्ह्यातील उत्कृष्ट १३ तलाठ्यामध्ये देशिंग-मोरगावच्या प्रतिभा धुमाळे यांचा झालेला समावेश होय. हा सन्मान म्हणजे अधिक जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे.यापुढेही काम करताना केवळ प्रशासकीय कामापुरते मऱ्यादित न राहता सामान्य नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडवण्याचा प्रयत्न करेन.येणाऱ्या काळात जनतेच्या सेवेसाठी प्रामाणिकपणे कार्यरत राहीन,असे मत पत्रकारांशी बोलताना प्रतिभा धुमाळे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

## देवळाली महोत्सव समितीच्या वतीने आयोजित 14 व्या देवळाली महोत्सवाचे उत्साहात उद्घाटन संपन्न



महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी**

31 जानेवारी रोजी सकाळी खंडेराव टेकडी येथील उद्यानात विविध मान्यवरांच्या हस्ते आकाशात फुगे सोडून फेस्टिवल चा शुभारंभ करण्यात आले.तत्पूर्वी

येथील जुन्या बस स्थानक परिसरात नाशिक सायकलिस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने व विविध शाळांमधील 100 विद्यार्थ्यांना एकत्र येत सायकल थॉन काढण्यात आली. जुने बस स्थानक- हौसन रोड-६ नं. नाका पुन्हा लामरोड मार्गे- नवीन बस स्थानक-झेंडा चौक-धोंडीरोड मार्गे खंडेराव टेकडी दरम्यान सायकल चालवताना नाशिक सायकलिस्ट अध्यक्ष अमित घुगे, डॉ मनीषा रौंदळ, सुरेश डोंगरे, उपाध्यक्ष दविंदर्सिंग भेला,बाळकृष्ण वेताळ, माधुरी गधाख, अश्विनी कोंडेकर, आदींसह सदस्यांनी पर्यावरण संवर्धनाच्या घोषणा देत हि सायकल थॉन पार पडली. यामध्ये शहरातील विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. नाशिक सायकलिस्ट फाऊंडेशनच्या उपाध्यक्षा मनीषा रौंदळ यांनी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्यासाठी सायकलिंगचे महत्व समजावून सांगितले. सर्व विद्यार्थ्यांनी प्रचंड उत्साहात आणि अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने प्रतिसाद देत आत्मियता दर्शवली. या थॉन दरम्यान खंडेराव टेकडी उद्यानात, रोटरीचे अध्यक्ष डॉ पुष्कर जोशी, सेवानिवृत्त प्राचार्या सुनीता आडके, नागेश देवडीगा, मीना पाटिल, डॉ अलका स्वादी, शशी मदन, शीला कामत, जय सुंदरमन, छाया हाबडे, मनोज कनोजिया, राजेंद्र यशवंते, कृष्णा लोखंडे,संजीव माथुर,नरहरी मुसळे, व टेम्पल हिल अन्नास ग्रुपचे सर्व सदस्य आदींच्या हस्ते सर्व सायकस्वारांसह सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. सूत्रसंचालन जीवन गायकवाड तर आभार संदीप शेटे यांनी मानले. या थॉनच्या यशस्वीतेसाठी ताराचंद लहांगे, हेमंत गायकवाड, रोशन वाजे, राम गोडे, अर्जुन संगमनेरे सुरेखा कुलथे, लक्ष्मी वटारे, प्रथमेश शिंदे, आदी प्रयत्नशील होते

## वाशिम शहरातील अतिक्रमण हटाव मोहिमेतील दुजाभाव थांबवावा.

### सावता परिषदचे शहराध्यक्ष चेतन संतोषराव इंगोले वाशिम शहराच्या वतीने व आरती संतोष ठोके यांच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन

महाराष्ट्र जीत

**वाशीम(प्रतिनिधी)** वाशिम शहरात नगरपरिषदेच्या वतीने सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, या कारवाईत फक्त फुटपाथवर उपजीविकेसाठी व्यवसाय करणाऱ्या गोरगरीब, कष्टकरी व महिलांवरच हातोडा चालवला जात असल्याचा आरोप होत आहे. तर दुसरीकडे, अवैध परवानग्यांवर उभारलेल्या मोठमोठ्या इमारती व पक्की बांधकामे मात्र कारवाईपासून दूर असल्याचे चित्र दिसून येत आहे.लहान व्यावसायिकांची उपासमारीकडे वाटचाल

सिव्हिल लाईन परिसरात देशमुख हॉस्पिटल ते महिला बचत गट परिसरात नुकत्याच झालेल्या अतिक्रमण हटाव कारवाईत अनेक लहान व्यावसायिकांचे हातावर पोट असलेले व्यवसाय उद्ध्वस्त झाले. या कारवाईमुळे अनेक कुटुंबांचे एकमेव उत्पन्नाचे साधन अचानक बंद झाले असून, विशेषतः महिला बचत गटाशी संबंधित महिलांसमोर आर्थिक असुरक्षिततेचे गंभीर संकट उभे ठाकले आहे.

नियम गोरगरीबांसाठीच का?

शहर सुशोभीकरण आणि शासन









नियमांची अंमलबजावणी आवश्यक असल्याचे मान्य असले, तरी नियमांचा बडगा केवळ दुर्बल घटकांवरच उगारला जात असेल, तर तो अन्यायकारक ठरतो, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून व्यक्त होत आहे. अवैध बांधकाम करून कोट्यवधींच्या इमारती उभारणाऱ्यांवर मात्र अद्याप ठोस कारवाई का नाही, असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे.जिल्हाधिकाऱ्यांकडे कडक शब्दांत निवेदन या पार्श्वभूमीवर चेतन संतोषराव इंगोले सावता परिषद शहराध्यक्ष, वाशिम शहराच्या वतीने आज (दि. ३०/१/२०२६) जिल्हाधिकारी साहेबांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात अतिक्रमण हटाव मोहिमेतील दुजाभाव थांबवावा आणि न्याय्य भूमिका घ्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

मुख्य मागण्या

बाधित लहान व्यावसायिकांना तातडीने पर्यायी जागा उपलब्ध करून द्यावी

नुकसानग्रस्त कुटुंबांचे योग्य पुनर्वसन करावे

आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना आर्थिक सहाय्य द्यावे

भविष्यातील कारवायांपूर्वी पूर्वसूचना व समन्वय साधावा

अवैध अतिक्रमण करून उभारलेल्या पक्क्या बांधकामांवर तात्काळ कारवाई करावी. नगरपरिषद व प्रशासनाने संवेदनशीलता, सामाजिक न्याय आणि मानवतेच्या भूमिकेतून निर्णय घ्यावा, अन्यथा ही मोहीम 'सुशोभीकरण' न राहता 'गरीब हटाव' ठरेल, अशी तीव्र भावना शहरात व्यक्त होत आहे.

निवेदन देताना यावेळी उपस्थित

रवी खोटे, गणेश कांबळे, नितीन गाडेकर, प्रमोद गाडेकर, पठाण मामू, सुमनबाई अंभोरे, राधाबाई धवसे, चंद्रभागाबाई काळे, वैभव जंगले, प्रवीण पाटील, प्रशांत तायडे, दीपक पोरे, सुरेश आवटे, राहुल लबडे, सय्यद मोबिन, विठ्ठल जाधव, शिवा वाणी, श्रावण भालेराव, संतोष आठवले, सचिन खोटे, गणेश वाणी, मंगेश मापारी इतर भरपूर जण उपस्थित होते.

## वाशीम मध्ये मुकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन उत्साहात साजरा.

### मूकनायक पत्रकार दिनानिमित्त महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केले अभिवादन.

महाराष्ट्र जीत

**वाशीम** स्थानिक संतोषी माता नगर येथील अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय येथे दि.३१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजता मुकनायक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन साजरा करण्यात आला.प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी दैनिक जनमाध्यमचे जिल्हा प्रतिनिधी पप्पू घुगे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून जेष्ठ पत्रकार बबनराव खिल्लारे, सुनिल कांबळे, प्रविण पट्टेबहादूर, युवा पत्रकार पुजा बनसोड व वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांची उपस्थिती होती.

सुरूवातीला भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण केले. नंतर कार्यक्रमांचे अध्यक्ष पप्पू घुगे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० रोजी पहीले मुकनायक नावांचे पाक्षिक काढून समाजाच्या व्यथा जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी आणि अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम मुकनायक घ्या माध्यमातून केले . त्यानंतर बहीष्कृत भारत, प्रबुद्ध भारत ,व जनता हे वर्तमान पत्र काढले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणत की, चळवळ जर चालवायची,गतीमान करायची असेल तर वर्तमान पत्राची गरज असते.नसता





त्या चळवळीची अवस्था पंख नसलेल्या पक्षासारखी होते.तर याचवेळी बबनराव खिल्लारे यांनी देखील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारीतेविषयी माहीती सांगून आजच्या पत्रकाराने समाजाच्या व्यथा प्रसार माध्यमातून मांडून न्याय देण्याचे काम केले पाहिजे.तर सुनिल कांबळे यांनी सांगितले की, पत्रकारीता करीत असतांना अनेक संकटना तोंड देवून समाजाला न्याय द्यावा लागतो.म्हणून पत्रकार हा निर्भीड व स्पष्टता असलेला असणे आवश्यक आहे. नंतर वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांचे हस्ते कार्यक्रमाचे अध्यक्ष पप्पू घुगे, बबनराव खिल्लारे, सुनिल कांबळे, प्रविण पट्टेबहादूर,व पुजा बनसोड यांचा शाल, पुष्पगुच्छ व मुकनायक पुस्तक देवून सन्मानित केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सुत्रसंचलन आयोजक राजकुमार पडघान यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रविण पट्टेबहादूर यांनी केले.कार्यक्रमाला डायमंड कोचींग क्लासेस चे संचालक माधव डोंगरदिवे, चंचलबाई गुंजकर, ज्योत्स्ना अवचार, संध्या सभादिंडे,के. डी.जाधव, विश्वनाथ पडघान, शंकर गुडदे, मधुकर हिवराळे,अजय अवचार, अस्लम शहा,केदार कबाडे, अविनाश कांबळे, चंद्रकला वाडकर,विशाखा बरडे,प्राची बरडे, इंदिराबाई इंकार,सिमा पाळेकर व नंदा अवचार यांचेसह अनेकांची उपस्थिती होती.

## "नृत्य म्हणजे आनंदाचा ठेवा आणि शारीरिक क्षमता वृद्धिंगत होण्याचे साधन " कथ्थक गुरु संजीवनी कुलकर्णी

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

देवळाली इनरव्हीलच्या वतीने पौराणिक नृत्य स्पर्धा सुभाष स्कूल येथे आयोजित करण्यात आली.विध्यार्थ्यांच्या कळागुणांना वाव मिळावा या हेतूने दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेत परिसरातील अकरा शाळा सहभागी झाल्या.दीप प्रज्वलन ईशस्तवन करून कार्यक्रमाची सुरवात झाली.

इंनरव्हील अध्यक्षा सीमा भट्टचार्य यांनी सर्वांचे स्वागत करून इंनेरव्हिलच्या कार्याची माहिती दिली. सेक्रेटरी शशी मदन यांनी या स्पर्धेचे प्रयोजन स्पष्ट केले.

आनंदी अथनी स्मिता प्रधान मीनल शाह यांनी परीक्षकाचे काम केले.

प्रमुख अतिथी संजीवनी कुलकर्णी यांनी स्पर्थकांना मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत प्रथम पारितोषिक सुभाष गुर्जर हिंदी मेडीयम स्कूल व तक्षशीला स्कूल यांना तर द्वितीय पारितोषिक देवळाली स्कूल तर तृतीय पारितोषिक सुभाष स्कूल इंग्लिश मेडीयम यांना देण्यात आले.उत्तजनार्थ पारितोषिक पोतदार स्कूल व वासुदेव अथनी स्कूल यांना देण्यात आले.

सूत्रसंचलन मीना पाटील यांनी तर आभार व्यक्त केले मोहिनी मंचनदा यांनी. या कार्यक्रमासाठी सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.



## चिंचांबा पेन येथे श्री शिवमहापुराण कथेचे आयोजन श्री खंडेश्वर महादेव संस्थान येथे होणार कथा

-रिसोड प्रतिनिधी भाऊसाहेब सरनाईक

रिसोड - तालुक्यातील चिंचांबा पेन येथे दरवर्षीप्रमाणेच यावर्षी श्री भोलेनाथाच्या कृपेने व महंत परमपूज्य श्री विश्वानंद सरस्वती महाराज (बाबाजी ) यांच्या आशीर्वादाने व मार्गदर्शनाने महाशिवरात्रीनिमित्त श्री शिव महापुराण कथेचे आयोजन दिनांक 9 फेब्रुवारी सोमवारपासून ते 16 फेब्रुवारी पर्यंत करण्यात आले आहे. श्री शिव महापुराण कथा ह. भ.प.श्री भागवतजी खराटे महाराज कवठा यांच्या सुमधुर वाणीतून होणार आहे सोबतच सप्ताहामध्ये विविध दैनंदिन धार्मिक कार्यक्रम होणार आहेत यामध्ये ज्ञानेश्वरी पारायण हरिपाठ तसेच महाशिवरात्रीनिमित्त अखंड अभिषेक होणार आहेत तालुक्यातील तसेच पंचक्रोशीतील भाविक मंडळींनी श्री शिवमहापुराण कथा श्रवण करून लाभ घ्यावा असे आवाहन खंडेश्वर संस्थान तसेच गावकऱ्यांकडून करण्यात आले आहे





## महाराष्ट्र चित्ररथ प्रथम- प्रजासत्ताक दिनानिमित्त परेड

महाराष्ट्र जीत

**कळंबोली पनवेल प्रतिनिधी:**

26 जानेवारी रोजी झालेला प्रजासत्ताक दिन या दिवशी दिल्ली येथील लाल किल्ला येथे झालेल्या परेड संचालन व चित्ररथाचे संचलन संपन्न पडले. यामध्ये आपल्या महाराष्ट्रातर्फे चित्ररथावर गणेशोत्सवांचा देखावा सादर केला होता. यादेखील संपूर्ण राज्यातून पहिला नंबर मिळाला आहे. जम्मू काश्मीर हा द्वितीय क्रमांकावर तर तृतीय क्रमांकावर केरळ राज्याचा चित्ररथ राहिला... केंद्र सरकारच्या वतीने संरक्षण मंत्रालयाने ही घोषणा केली...

नवी दिल्ली : यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्त (Republic Day 2026) नवी दिल्लीतील लाल किल्ला येथील कर्तव्यपथावर झालेल्या संचलनात महाराष्ट्राच्या चित्ररथाला(गणेश उत्सव देखावा) पहिल्या क्रमाकांचे





बक्षीस मिळालं आहे... महाराष्ट्राच्या चित्ररथाची यंदाची संकल्पना ही गणेशोत्सवाची होती आणि तो चित्ररथ सर्वोत्कृष्ठ ठरला आहे... तसेच जम्मू काश्मीर हा द्वितीय क्रमांकावर तर तृतीय क्रमांकावर केरळ राज्याचा चित्ररथ राहिला... केंद्र सरकारच्या वतीने संरक्षण मंत्रालयाने ही घोषणा केली...

प्रजासत्ताक दिनी कर्तव्य पथावर महाराष्ट्र राज्याकडून गणेशोत्सवाची संकल्पना मांडण्यात आली होती... तुषार प्रधान, रोशन इंगोले, कृष्णा सालवटकर, श्रीपाद भोंगाडे यांनी महाराष्ट्राच्या चित्ररथाला आकार दिला होता... विविध निकषांवर झालेल्या मूल्यांकनानंतर महाराष्ट्राला प्रथम क्रमांक जाहीर करण्यात आला...

गेली कित्येक वर्षे प्रथम क्रमांक येण्याचा मान महाराष्ट्राने यावर्षी अबाधित राखला.

आत्मनिर्भर भारत या संकल्पनेवर महाराष्ट्राच्या चित्ररथावर सजावट करण्यात आली होती... यामध्ये महाराष्ट्रातील गणेशोत्सवाचे दर्शन घडलं... महाराष्ट्राच्या चित्ररथावर अष्टविनायकांच्या प्रतिकृती, ढोलताशे आणि गणपती बाप्पाची मूर्ती अशी सजावट होती... गणेशोत्सव आज असंख्य लोकांना आत्मनिर्भर बनवत आहे... यावरूनच गणेशोत्सव-आत्मनिर्भरतेचे प्रतिक ही संकल्पना चित्ररथातून सादर केली गेली...

यंदाच्या महाराष्ट्राच्या चित्ररथाच्या माध्यमातून आर्थिक आत्मनिर्भरता कशी आणली जाते, हे दाखवण्यात आलं. गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील प्रमुख क्षण आहे. गणेशोत्सवाच्या काळात महाराष्ट्रात 60 ते 70 लाख कोटींची उलाढाल होते... आत्मनिर्भर भारत या मोहिमेला गणेशोत्सवाच्या माध्यमातून कशी चालना मिळते, हा संदेश चित्ररथाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे...

लोकमान्य टिळकांनी लोकांनी एकत्र येण्यासाठी गणेशोत्सवाची सुरूवात केली... गणेशोत्सवचे स्वरुप दिवसेंदिवस मोठे होत चालले आहे... मुंबईसह राज्यातील असंख्य मंडळांकडून गणेशोत्सव साजरा केला जातो... गणेशोत्सवाच्या माध्यमातून आज कोट्यवधींची उलाढाल होत आहे... मूर्तीकार, सजावट करणाऱ्यांना मिळणारा रोजगार तसेच त्यातून तयार होणारी आर्थिक साखळी हा चित्ररथाचा मुख्य विषय होता...

**देशभरातून 30 चित्ररथांचा समावेश**

या वर्षीच्या परेडमध्ये एकूण 30 चित्ररथांनी भाग घेतला... 17 राज्ये आणि 13 केंद्र सरकारच्या विभागातील चित्ररथाचा यामध्ये समावेश होता... स्वातंत्र्याचा मंत्र वंदे मातरम आणि समृद्धीचा मंत्र आत्मनिर्भर भारत ही यंदाची थीम होती...

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात कोणत्या राज्याचा चित्ररथ सहभागी होणार यासाठी एक समिती निर्णय घेते... यामध्ये कलाकार, विविध क्षेत्रातील तज्ज्ञ, पद्म पुरस्कार विजेते सामील असतात... प्रत्येक वर्षी आलटून पालटून राज्यांच्या चित्ररथांना परेडमध्ये समाविष्ट केले जाते...

## समृद्धी बिल्डकॉनचे संचालक पंकज शेलार यांचा अभिष्टचिंतन सोहळा विविध उपक्रमांनी साजरा

महाराष्ट्र जीत

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी गोकुळ लोखंडे**

विनायक दामोदर सावरकर यांच्या जन्मभूमी भगूर येथील भूमिपुत्र समृद्धी बिल्डकॉनचे संचालक व भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उद्योग आघाडीचे ज्येष्ठ नेते पंकज शेलार यांचा विविध सामाजिक उपक्रम राबवत अभिष्टचिंतन सोहळा संपन्न कुठलाही गाजावाजा ब्लॅकेट हॉल फटाक्यांची आतिषबाजी न करता अगदी साध्यापणाने वाढदिवस साजरा करत परिसरातील अनेक चाहत्यांनी भाऊंवर प्रेम करणारे हितचिंतक यांनी वृक्षारोपणाचा कार्यक्रम असेल रुणालयामध्ये फळे वाटप शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप तसेच दुर्मिळ भागातील पाड्यांवर जाऊन ब्लॅकेट वाटत असेल खाऊ वाटप असेल त्यांना आर्थिक मदत असेल असे अनेक सामाजिक उपक्रम राबवत हितचिंतकांनी पंकज भाऊ शेलार यांचा अभिष्टचिंतन सोहळा संपन्न केला परिसरातील तसेच सर्व क्षेत्रातील सामाजिक संघटना असतील किंवा प्रभागातील समस्या असतील अशा सर्व समाज उपयोगी कार्यामध्ये पंकज भाऊ शेलार यांची अग्रस्थानी धाव असते त्यांच्या या स्वभावामुळे परिसरामध्ये त्यांना मानणारा वर्ग मोठ्या संख्येने आहे त्यांच्या या अभिष्टचिंतनात निमित्त सामाजिक राजकीय शैक्षणिक कला क्रीडा सहकार सर्व क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना प्रत्यक्ष भेटून तसेच दूरध्वनी माध्यमातून शुभेच्छा दिल्या





यावेळी देवळाली कॅम्प येथील आर के ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष राहुल भाऊ काळे प्रशांत भाऊ बाविस्कर विजय भाऊ निकम राहुल पगारे एन टीव्ही न्यूज चे कार्यकारी संपादक गोकुळ भाऊ लोखंडे यांनी छोटे कानी वाढदिवस साजरा करून त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# सुधागड तालुक्यात जांभूळपाडा येथे युतीची बैठक; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**सुधागड-पाली (गौसखान पठाण)**

सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथील 'निर्वाणा अलाईव्ह' येथे भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) आणि आरपीआय (अ) यांची संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून हजारो संख्येने कार्यकर्ते उपस्थिती होते.



दक्षिण रायगड जिल्हा अध्यक्ष तथा राज्यसभेचे खासदार धैर्यशील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकाश देसाई यांच्या नेतृत्वात ही बैठक पार पडली. जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक महत्त्वाची ठरली. यावेळी नुकतेच शिवसेना (शिंदे गट) पक्षातून भारतीय जनता पार्टीत प्रवेश केलेले माजी जिल्हा परिषद सदस्य रवि देशमुख व मिलिंद देशमुख हे पक्षात आल्याने पक्षाच्या ताकदीत भर घातली. त्यांच्या प्रवेशामुळे स्थानिक पातळीवर अधिक बळकटी मिळाली या बैठकीत कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करून आगामी निवडणुकीत युती उमेदवारांना विजय मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा पवार गट) आणि आरपीआय (अ) यांचे जिल्हा व तालुका पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नेत्यांनी स्पष्ट केले की देशात, राज्यात आणि आता जिल्ह्यात देखील ही युती भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्यास कटिबद्ध आहे. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीत सर्व युती उमेदवारांना विजय मिळवून देऊन जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. दरम्यान, सुधागड तालुक्यात निवडणुकीचे वातावरण तापले असून या युतीकडून ॲड. नीलिमा पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा म्हणून प्रशासनाचा दांडगा अनुभव, अभ्यासू वृत्ती आणि जनतेशी थेट संवाद साधणारी ओळख – यामुळे त्यांचा प्रचार जोरात सुरू आहे. भाजप जिल्हाध्यक्ष तथा खासदार धैर्यशील पाटील यांच्या पत्नी म्हणून त्यांना राजकीय व प्रशासकीय क्षेत्राचा भक्कम पाया लाभला आहे.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" टप्पा ३

### रा. जि. प. उत्कृष्ट प्राथमिक शाळा गायमुख तालुक्यात प्रथम

**तळा -किशोर पितळे**-राज्य शासनाच्या "मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा" या महत्वाकांक्षी योजनेच्या टप्पा क्र.३ मध्ये रा. जि. प. उत्कृष्ट प्राथमिक शाळा, गायमुख (ता. तळा) हिने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.दि.१ डिसेंबर २०२३रोजी सुरू करण्यात आलेली ही योजना सरकारी शाळांच्या आधुनिकीकरण, सौंदर्यीकरण व सर्वांगीण विकासासाठी राबवण्यात येत आहे. या योजनेचा मुख्य उद्देश शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण करणे, तसेच स्पर्धात्मक वातावरणातून विद्यार्थ्यांना आनंददायी व प्रेरणादायी शिक्षण पर्याय उपलब्ध करून देणे हा आहे.या योजने अंतर्गत पायाभूत सुविधा, शासनाच्या ध्येय-धोरणांची प्रभावी अंमलबजावणी व शैक्षणिक संपादनूक या प्रमुख निकषांवर केंद्रस्तरीय, तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय समित्यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन सखोल परीक्षण केले. या पाहणीप्रसंगी रा. जि. प.अलिबाग शिक्षणाधिकारी सन्माननीय श्रीम. ललितादहीतुले उपशिक्षणाधिकारी





सन्माननीय संतोष शेडगे साहेब, उपशिक्षणाधिकारी सन्माननीय श्रीमती काकडे तालुकागटशिक्षणाधिकारी सन्माननीय सुरेखा तांबट , तसेच विस्ताराधिकारी व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

यावेळी गावचे अध्यक्ष रमेश पाखड व सर्व पदाधिकारी, महिला मंडळ अध्यक्ष श्रीमती बबिता चाचले व पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष नामदेव बटावले व सर्व सदस्य, तसेच सर्व ग्रामस्थ व महिला पालक यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. सन्माननीय शिक्षणाधिकारी यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. पटसंख्या वाढीसाठी कसे प्रयत्न करता येईल याचे सखोल मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे रोजगार निर्मिती या संदर्भाने अनमोल असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचे प्रत्यक्ष इंग्रजी व हिंदी वाचन घेतले तसेच परसबाग,शौचालय , सौरऊर्जा प्रकल्प , हँडवॉश स्टेशन याची प्रत्यक्ष पहाणी करून समाधान व्यक्त केले .

शाळेचे मुख्याध्यापक कृष्णा कांबळे, रायगड जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अमिष भौड, चेतन जगताप, राहुल उगलमुगले तसेच विद्यार्थ्यांनी मान्यवरांचे मनःपूर्वक स्वागत केले.

या उल्लेखनीय यशामुळे रा. जि. प. उत्कृष्ट शाळा, गायमुख ही शाळा रायगड जिल्ह्यातील आदर्श शाळेचा मानाचा दर्जा प्राप्त करत असून, ही कामगिरी संपूर्ण तालुक्यासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

## जिल्हास्तरीय 'खेलो इंडिया' वेटलिफ्टिंग केंद्र ठाणेकरित केली जाणार क्रीडा मार्गदर्शकाची नेमणूक

ठाणे,दि.30(जिमाका) : क्रीडा मंत्रालय, केंद्र शासनाच्या अंतर्गत खेलो इंडिया या योजनेमधून देशातील विविध जिल्हयांमध्ये 1 हजार खेलो इंडिया सेंटर निर्माण करण्याचा मानस आहे. खेलो इंडिया या योजनेचे उद्दिष्टे ग्रास रुट लेव्हल च्या मुलांना खेळाचे प्रशिक्षण देवून ऑलिम्पिक या जागतिक स्पर्धेसाठी अधिकाधिक खेळाडू तयार करणे हा आहे. या योजनेंतर्गत मान्यता प्राप्त खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्रावर शासकीय मार्गदर्शक, अनुभवी मार्गदर्शक तसेच माजी सर्वोत्कृष्ट खेळाडू यांची सेवा देण्यात येणार आहे.

ठाणे जिल्ह्याकरिता वेटलिफ्टिंग या खेळाचे खेलो इंडिया केंद्र तालुका क्रीडा संकुल कोपरी, ठाणे येथे कार्यान्वित करण्यात येणार आहे, तरी 2025-26 या वर्षाची वेटलिफ्टिंग या खेळाचे जिल्हास्तरीय खेलो इंडिया केंद्र चालू करावयाचे असून तज्ञ क्रीडा मार्गदर्शकाची नेमणूक करावयाची आहे. ही नियुक्ती निव्वळ मानधन तत्वावर करण्यात येईल, त्यानुसार इच्छुक प्रशिक्षकांनी आपला परिपूर्ण लेखी अर्ज संपूर्ण प्रमाणपत्रासह जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, कोर्ट नाका, ठाणे (पश्चिम) 400601 या पत्त्यावर सादर करावा, असे जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी कळविले आहे.

प्रशिक्षक पदाकरिता अहर्ता खालीलप्रमाणे -

1) 18 ते 45 वर्षे वयोगट, वेटलिफ्टिंग या खेळामध्ये अतिउच्च कामगिरी / गुणवत्ता असल्यासव समितीच्या मान्यतेने 50 वर्षापर्यंत उमेदवारांना संधी देण्यात येईल, 2) ऑलिंपिक / एशियन गेम्स / जागतिक अजिंक्यपद अधिकृत स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त व वेटलिफ्टिंग प्रशिक्षणाच्या अनुभवासह, 3) जागतिक करंडक स्पर्धा / एशियन चैंपियनशिप / साऊथ एशियन स्पर्धा / संबंधित वेटलिफ्टिंग खेळाच्या अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धा सहभाग / पदक प्राप्त खेळाडू वेटलिफ्टिंग प्रशिक्षणाच्या अनुभवासह, 4) राष्ट्रीय किंवा राज्य पुरस्कारार्थी वेटलिफ्टिंग प्रशिक्षणाच्या अनुभवासह, 5) वेटलिफ्टिंग एनआयएस पदविका किंवा संबंधित वेटलिफ्टिंग खेळाचे अधिकृत लेवल कोर्सेस किंवा बीपीएड एमपीएड सह राष्ट्रीय स्पर्धा पदक प्राप्त किंवा नॅशनल गेम्स पदक प्राप्त वेटलिफ्टिंग प्रशिक्षणाच्या अनुभवासह, 6) वेटलिफ्टिंग राज्यस्तर खेळाडू बीपीएड एमपीएड सह कमीत कमी 10 वर्ष वेटलिफ्टिंग प्रशिक्षणाच्या अनुभवासह.

वरील प्रशिक्षक पदाच्या अहर्ताप्रमाणे जास्तीत जास्त वेटलिफ्टिंग प्रशिक्षकांनी दि. 13 फेब्रुवारी 2026 पर्यंत आपले अर्ज कार्यालयात सादर करावे. तसेच अधिक माहितीसाठी तालुका क्रीडा अधिकारी सायली जाधव, मो.क्र. 8356084769 तसेच क्रीडा कार्यकारी अधिकारी सुचिता तेंडुलकर मो. क्र.8433691119 हिमानी परब (८३६९७१६०४६) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के यांनी केले आहे.

# औषधी असा अलिबाग चा प्रसिद्ध पांढरा कांदा काढणीला सुरुवात

## शेकडो महिलांच्या हाताला रोजगार उपलब्ध

**अलिबाग(रत्नाकर पाटील)**

चविष्ट, रुचकर आणि औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असा अलिबाग तालुक्यातील प्रसिद्ध पांढरा कांदा आता काढणीस तयार झाला असून, शेतकऱ्यांमध्ये काढणीची लगबग सुरू झाली आहे. अलिबाग तालुक्यातील कार्ले, सागाव परिसरात सध्या मोठ्या प्रमाणावर कांदा काढणीचे काम सुरू असून या प्रक्रियेमुळे गावासह परिसरातील शेकडो महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. कांदा काढणीपासून ते कांद्याच्या माळा तयार करण्यापर्यंत विविध टप्प्यांमध्ये महिलांच्या हाताला काम मिळू लागले आहे. फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत कांद्याच्या माळी तयार होऊन त्या बाजारात दाखल होण्याची शक्यता आहे.





अलिबाग तालुक्यातील कार्ले, खंडाळे, नेहुली, वाडगावआदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर पांढऱ्या कांद्याची लागवड करण्यात आली आहे. तालुक्यात सुमारे 300 हेक्टर क्षेत्रात कांद्याची लागवड झाल्याची माहिती समोर आली आहे. भात कापणीची कामे पूर्ण झाल्यानंतर नोव्हेंबर महिन्यात कांद्याची लागवड करण्यात आली होती. आता हा पांढरा कांदा पूर्णपणे तयार झाला असून, गेल्या दोन दिवसांपासून काढणीला वेग आला आहे.

कांदा काढणीबरोबरच त्याचे सुकविणे आणि माळा तयार करण्यासाठी स्थानिक कामगारांना मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळत आहे. विशेषतः महिलांसाठी हे रोजगाराचे महत्त्वाचे साधन ठरत असून, मार्च महिन्यापर्यंत शेकडो जणांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध होण्याची शक्यता आहे. काही शेतकऱ्यांनी एक ते दोन एकर क्षेत्रात तर काहींनी दोन ते तीन गुंठे क्षेत्रात कांद्याची लागवड केली आहे. तर काही शेतकऱ्यांनी घराशेजारी परसबाग म्हणूनही कांदा घेतला आहे. सध्या कांदा काढणीचे काम जोरात सुरू असून, काढलेला कांदा सुकवून त्याच्या माळी तयार करण्याचे कामही समांतरपणे केले जात आहे. अलिबागचा पांढरा कांदा चविष्ट आणि गुणधर्मयुक्त असल्यामुळे त्याला राज्यातील विविध जिल्ह्यांतून मोठी मागणी असते. रायगड जिल्ह्यातील बाजारपेठांबरोबरच परदेशातूनही या कांद्याला मागणी आहे. विशेष म्हणजे, अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला सौदी अरेबियातून मागणी आल्याची माहिती असून, एक कंटेनर कांदा निर्यातीसाठी मागविण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.

अलिबागचा पांढरा कांदा स्थानिक ग्राहकांसह पर्यटकांच्या कायमच पसंतीला उतरतो. सध्या कांदा काढणीला सुरुवात झाली असून, रायगड जिल्ह्यातील मुरूडसह परदेशातून, विशेषतः सौदी अरेबियातून कांद्याला मागणी आली आहे. त्यादृष्टीने तयारी सुरू आहे. कांदा काढणी, सुकविणे आणि माळा तयार करण्याच्या कामामुळे स्थानिकांना रोजगार मिळत आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात कांदा बाजारात दाखल होईल. यंदा कांद्याला चांगला दर मिळेल, असा विश्वास वाटत आहे.

**- सतीश म्हात्रे, कांदा उत्पादक शेतकरी, कार्ले-**